नि.दि.दा.क्र.२७९/२०२४
चंद्रकांत वि. सुभेदार

<u>निशाणी क्र.३७ वरील आदेश</u>

प्रतिवादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द झालेला 'कैफियत नाहीचा' आदेश रद्द होवुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, दाव्याचे कामी प्रतिवादीचे विरुध्द 'कैफियत नाहीचा' आदेश झालेला आहे. सदर दाव्यातील काही आवश्यक ती माहीती व कागदपत्रे या प्रतिवादींना वेळेत उपलब्ध होवु न शकल्यामुळे प्रतिवादी योग्य त्या मुदतीत त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादीने निशाणी क्र.५ चे ताकीद अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. पंरतु कैफियत देण्याचे राहुन गेले आहे. सदरची कैफियत दाखल करुन घेतल्यास दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. या उलट कैफियत दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशीराची माफी करण्यात यावी व प्रतिवादीचे विरुध्द झालेला 'कैफियत नाहीचा' आदेश रद्द होवुन त्यांची कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार सदरील प्रतिवादी यांनी सुमारे ६ महिने उशीराने कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादीस सर्व कागदपत्रे वेळेत मिळुनही कैफियत दाखल केली नाही. सबब प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा ही विनंती केली आहे.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी आणि प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव, तुर्तातुर्त ताकीद व इतर तदअनुषंगीक बाबींसाठी दाखल केला आहे.

५. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादीची कैफीयत रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यांना तशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना तशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे

प्रतिवादीने दाखल केलेले कैफीयत रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. परंतु प्रतिवादींना दावा समन्सची बजावणी नि.क्र.९ ते ११ अन्वये दिनांक २६.१२.२०२४ रोजी करण्यात आली आहे. त्यांनी कैफियत व म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्या विरुध्द दिनांक २९.०८.२०२५ रोजी दावा विना कैफियत व म्हणणे चालविण्याचा आदेश करण्यात आला आहे. प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिनांक २९.०८.२०२५ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादीस त्यांची कैफियत दाखल करण्यास मुदतीचा कालावधी वगळता ४ महिने ०३ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीने वादी यास खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.३७) रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो. सदरची रक्कम वादीस देण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वरील पुर्तता केल्यानंतर त्यांच्या विरुध्द झालेला 'कैफियत व म्हणणे नाहीचा' आदेश रद्द करण्यात येतो व त्यांची कैफीयत रेकॉर्डवर घेण्यात येते.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.11 15:04:56 +0530

(आर.एम.भेंडे)
दूसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई

स्थळ : वाई
दिनांक : १०.११.२०२५